**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
मुख्य इमारत, १ ला मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
Email: panandraste-rev@mah.gov.in

क्रमांक : R&FD-86030/9/2026-FAR-REV-REVENUE/(E-1821680) दिनांक : ३१/०८/२०२६.

**प्रति**,
१. सर्व विभागीय आयुक्त
२. सर्व जिल्हाधिकारी

**विषय** :- "मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना" अंतर्गत दिनांक १ सप्टेंबर २०२६ ते ०२ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत क्षेत्रीय स्तरावर विशेष अभियान राबवण्याबाबत..

**संदर्भ** :- १. महसूल व वनविभाग, शासन निर्णय क्रमांकः लवेसु-२०२५/प्र.क्र.४५८/भूमापन (ल-१), दि.२९/८/२०२५.
२. महसूल व वन विभाग, शा.नि. क्र.लवेसू-२०२५/प्र.क्र.०२/पाणंद रस्ते, दि. १४.१२.२०२५.

महोदय,

ग्रामीण भागात शेत/पाणंद रस्त्यांची असलेली आवश्यकता, त्यांचे महत्व व सद्यःस्थितीत शेत/पाणंद रस्त्याच्या कामांकरिता मनरेगा अंतर्गत येणा-या अडचणी विचारात घेता पूर्णपणे यंत्रसामुग्रीचा वापर करुन शेत/पाणंद रस्ते तयार करण्यासाठी महसूल विभागामार्फत "मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजना" सुरु करणे व ती राबविण्याकरीता सोपी व सुलभ कार्यपध्दती निश्चित करण्याबाबत पारीत करण्यात आलेला शासन निर्णय दि.१४/१२/२०२५ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. राज्यात दिनांक १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर या कालावधीत महसूल विभागामार्फत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाअंतर्गत "राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता" सेवा पंधरवडा अभियान राबविण्यात येते. या अभियानाच्या माध्यमातून नागरिकांना महसूल विभागाशी संबंधित विविध सेवा सुलभ व वेळेत उपलब्ध करून देण्याबरोबरच, नागरिकांच्या प्रलंबित महसूलविषयक कामांचा प्राधान्याने निपटारा करून त्यांना जलद व प्रभावी सेवा देण्यावर विशेष भर देण्यात येतो. या अभियानाअंतर्गत यावर्षी दिनांक १ सप्टेंबर २०२६ ते ०२ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत "शेत/पाणंद रस्त्यांबाबत" क्षेत्रीय स्तरावर विशेष मोहिम राबवावयाची आहे.

२. सदर मोहिम राज्यामध्ये राबविताना एकसमान कार्यवाही करण्याकरीता जमाबंदी आयुक्त व संचालक भूमि अभिलेख यांचेकडून मानक कार्यपध्दती (Standard Operating Procedure) निश्चित

करण्यात आलेली असून ती यासोबत जोडण्यात येत आहे. सदर मानक कार्यपध्दतीचा अवलंब करुन दि.२९.०८.२०२५ च्या शासन निर्णयानुसार 'D' व 'E' प्रकारातील रस्त्यांची माहिती संकलन, गावाची शिवार फेरी व प्रत्येक ग्रामपंचायतीमधून दोन रस्त्यांची निवड, अतिक्रमणमुक्त करण्याची कार्यवाही, विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीची बैठक व रस्त्यांना मान्यता देण्याची कार्यवाही, योजनेची व्यापक प्रचार-प्रसिद्धी व वेबपोर्टलवर अभिप्राय/सूचना नोंदणी इत्यादी कामे राज्यात एकसमान पध्दतीने करावयाची आहेत. सदर मानक कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करुन सदर मोहिम यशस्वीपणे राबविण्यात यावी. तसेच विभागीय आयुक्त यांनी त्यांच्या विभागांतर्गत जिल्ह्यांचा एकत्रित अहवाल शासनास दि.०४/१०/२०२६ पर्यंत सादर करावा.

आपला,

Digitally signed by
VIKAS SHANKAR KHARAGE
Date: 31-08-2026
17:21:26

(विकास खारगे)
अपर मुख्य सचिव (महसूल, मुद्रांक, नोंदणी)

प्रत माहितीसाठी :- जमाबंदी आयुक्त व संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे

**विषय : छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाअंतर्गत मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेबाबत करावयाच्या कार्यवाही संदर्भातील मार्गदर्शक सूचना**

**<u>मानक कार्यपद्धती (Standard Operating Procedure)</u>**

---

**टप्पा १ - ग्रामपंचायत स्तरावर प्रचार-प्रसिद्धी, जनजागृती व 'D'/'E' प्रकारातील रस्त्यांची माहिती संकलन**

**जबाबदार अधिकारी:**

- ग्राम महसूल अधिकारी (तलाठी)
- ग्रामसेवक
- कृषी सहाय्यक
- सरपंच
- महसूल सेवक (कोतवाल)
- पोलीस पाटील

**प्रक्रिया :**

१. प्रपत्र-१ व प्रपत्र-२ चे ग्राम महसूल अधिकारी यांचेमार्फत ग्रामपंचायत स्तरावर चावडी वाचन करणे.
२. ग्रामस्थांना नकाशावर असलेल्या व नसलेल्या रस्त्यांची माहिती देणे.
३. नकाशावर नसलेल्या परंतु प्रत्यक्ष वापरात असलेल्या 'D'/'E' प्रकारातील रस्त्यांची समितीमार्फत प्रत्यक्ष पाहणी करून माहिती संकलित करणे.

---

**टप्पा २ - प्रत्येक ग्रामपंचायतीमधून दोन रस्त्यांची निवड**

**जबाबदार अधिकारी:**

- ग्राम महसूल अधिकारी
- ग्रामसेवक
- कृषी सहाय्यक
- सरपंच
- पोलीस पाटील

**प्रक्रिया:**

१. प्रत्येक ग्रामपंचायतीमधून किमान दोन रस्त्यांची निवड करणे.
२. सदर दोन रस्त्यांपैकी किमान एक रस्ता हा अडचणीचा अथवा अतितातडीच्या स्वरूपाचा असावा.
३. निवडलेल्या रस्त्यांची माहिती तहसीलदारांकडे समितीने संयुक्त सहीने सादर करणे.

---

**टप्पा ३ - भूमिअभिलेख विभागामार्फत सीमांकन**

**जबाबदार अधिकारी:**

- उप अधीक्षक भूमि अभिलेख (Deputy Superintendent, Land Records)

**प्रक्रिया:**

१. तहसीलदारांकडून अंतिम यादी मिळाल्यानंतर सीमांकन करणे.

२. नकाशावरील मूळ जागा + वर्तमान जागा यांचा विचार करणे.
३. Scanning / Digitization, Geo-referencing केलेल्या नकाशांचा वापर करून:
   - रस्त्यांची लांबी-रुंदी, अक्षांश-रेखांश निश्चित करणे ( प्रत्येक गटात रस्ता प्रवेश व शेवट ठिकाणचे अक्षांश - रेखांश जतन करणे.)
   - शेतरस्त्यांच्या हद्दींचे सिमांकन करणे.
४. मोजणी शुल्क आकारले जाणार नाही.

---

**टप्पा ४ - अतिक्रमित रस्त्यांवरील कायदेशीर कारवाई**

**जबाबदार अधिकारी :** तहसीलदार

**प्रक्रिया:**

१. अतिक्रमण असल्यास दिनांक १७/०९/२०२६ ते दिनांक २२/०९/२०२६ दरम्यान नियमानुसार कार्यवाही करणे.
२. आवश्यक असल्यास प्रस्तावित रस्त्यांची नकाशा, सीमांकन अहवाल, ७/१२, फेरफार नोंदी यांची प्रत्यक्ष पडताळणी करणे.
३. अतिक्रमण निष्कासित करणेसाठी **मामलेदार न्यायालय अधिनियम, १९०६ कलम ५** व **महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १४३** अन्वये नोटीस बजावणी.
४. सुनावणी मंडळ अधिकारी कार्यालयात आयोजित करणे.
५. पंच साक्षीदारांचे जबाब घेणे व आदेश निर्गमित करणे.
६. आवश्यक असल्यास पोलिसांची मदत घेणे. (गृह विभागाचा आदेश दि. ०५.०५.२०२५/ शासन अधिसूचना दि.३१.१२.२०२५ नुसार).

---

**टप्पा ५ - विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीची बैठक व रस्त्यांना मान्यता देण्याची कार्यवाही**

**जबाबदार अधिकारी : उपविभागीय अधिकारी/तहसिलदार**

**प्रक्रिया:**

१. तहसीलदारांकडून प्राप्त प्रस्तावांची छाननी करणे.
२. रस्त्यांची पात्रता तपासणे.
३. आवश्यक बैठक घेणे.
४. पात्र रस्त्यांचे प्रस्ताव विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीकडे पाठविणे.
५. विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीने पात्र रस्त्यांना मान्यता देणे.

---

**टप्पा ६ - महापाणंद वेबपोर्टलवर अभिप्राय/सूचना नोंदणी**

**जबाबदार अधिकारी : सर्व संबंधित यंत्रणा**

**प्रक्रिया:**

१. ग्रामस्थांना त्यांच्या गावातील शेत/पाणंद रस्त्यांबाबत उपलब्ध माहिती तपासण्यास तसेच आवश्यक सूचना व अभिप्राय **महापाणंद** पोर्टलवर नोंदविण्यास मार्गदर्शन ग्रामस्तरीय समितीने करावे.

२. प्रचारादरम्यान ग्रामस्तरीय समितीने खालील बाबी स्पष्ट कराव्यात :
महापाणंद पोर्टल → रस्त्याबाबत माहिती → सूचना → अभिप्राय → नोंदणी.

---

**जिल्हास्तरावर करावयाची कार्यवाही - प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांनी खालील बाबींचे दैनिक/नियमित संनियंत्रण करावे**

- एकूण ग्रामपंचायतींपैकी किती ग्रामपंचायतींमध्ये चावडी वाचन पूर्ण झालेले आहे, याची तालुकानिहाय माहिती घेणे.
- एकूण ग्रामपंचायतींपैकी किती ग्रामपंचायतींमध्ये शिवार फेरी पूर्ण झालेली आहे, याची तालुकानिहाय माहिती घेणे.
- निवडलेल्या रस्त्यांपैकी अतिक्रमण असलेले रस्ते व अतिक्रमण नसलेले रस्ते यांची तालुकानिहाय माहिती घेणे.
- विधानसभा समितीकडे पाठविलेल्या एकूण रस्त्यांच्या प्रस्तावांची माहिती घेणे.
- समिती मार्फत मान्य झालेले रस्ते यांची माहिती घेणे.
- अभियान समाप्तीनंतर प्रत्येक विभागीय आयुक्त यांनी त्यांच्या विभागांतर्गत जिल्ह्यांचा विधानसभानिहाय एकत्रित अहवाल संकलित करून खालील प्रपत्रामध्ये शासनास सादर करावा.

| **विशेष अभियान - विधानसभा मतदारसंघनिहाय प्रगती अहवाल** | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **जिल्हा :** | | **अहवाल कालावधी : ०१ सप्टेंबर २०२६ ते ०२ ऑक्टोबर २०२६** | | | | **अहवाल सादर दिनांक :** | |
| अ.क्र. | विधानसभा क्षेत्राचे नाव व क्रमांक | गावाचे नाव | दि.२९.०८.२०२६ च्या शासन निर्णयानूसार 'D' व 'E' प्रकाराच्या माहिती संकलित केलेल्या रस्त्यांची संख्या | भूमि अभिलेख विभागामार्फत सीमांकन केलेल्या रस्त्यांची संख्या | तहसिलदारांमार्फत अतिक्रमण निष्कासित केलेल्या रस्त्यांची संख्या | विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीमार्फत मान्यता देण्यात आलेल्या रस्त्यांची संख्या | लाभार्थी/नागरिकांची संख्या |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |

**दिनांक १ सप्टेंबर २०२६ ते ०२ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत "शेत/पाणंद रस्त्यांबाबत" क्षेत्रीय स्तरावर विशेष मोहिम रुपरेषा**

| कालावधी | कार्यवाही | जबाबदार यंत्रणा |
|---|---|---|
| १ ते १० सप्टेंबर २०२६ | ग्रामपंचायत स्तरावर प्रचार-प्रसिद्धी, जनजागृती व 'D'/'E' प्रकारातील रस्त्यांची माहिती संकलन | ग्रामस्तरीय समिती |
| ११ ते १६ सप्टेंबर २०२६ | गावाची शिवार फेरी व प्रत्येक ग्रामपंचायतीमधून दोन रस्त्यांची निवड(सदर दोन रस्त्यांपैकी किमान एक रस्ता हा अडचणीचा अथवा अतितातडीच्या स्वरूपाचा असावा.) | ग्राम महसूल अधिकारी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, सरपंच, पोलीस पाटील |
| १७ ते २२ सप्टेंबर २०२६ | भूमिअभिलेख विभागामार्फत सीमांकन व अतिक्रमण असल्यास अतिक्रमणमुक्त करण्याची कार्यवाही | तहसीलदार व उप अधीक्षक भूमि अभिलेख |
| २३ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर २०२६ | विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीची बैठक व रस्त्यांना मान्यता देण्याची कार्यवाही | विधानसभा क्षेत्रस्तरीय समिती |
| १ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर २०२६ | योजनेची व्यापक प्रचार-प्रसिद्धी व वेबपोर्टलवर अभिप्राय/सूचना नोंदणी | सर्व संबंधित यंत्रणा |